| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | १४ / १० / २००३ |
| नोंदणी दिनांक | : | १४ / १० / २००३ |
| निकाल दिनांक | : | १२ / ०५ / २०२६ |
| कालावधी | : | व. म. दिवस |
| | | २२ ०६ २८ |

**भाग 'अ'**

<table>
<tr><td rowspan="4"></td><td colspan="3"><u>शहापूर येथील न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांचे न्यायालयात</u><br><u>ता. शहापूर, जि. ठाणे.</u><br>(पिठासीन अधिकारी कु. एस.एस.कुळकर्णी)</td></tr>
<tr><td colspan="2"><u>नियमीत फौजदारी खटला क्र.: १७३/२००३</u><br>CNR No. MHTH20-0005242003</td><td><u>निशाणी</u><br><u>क्र.३४</u></td></tr>
<tr><td>निकाल दिनांक</td><td colspan="2">१२/०५/२०२६</td></tr>
<tr><td>गुन्हा क्र. १७५/२००३</td><td colspan="2">शहापूर पोलीस स्टेशन, ता. शहापूर, जि. ठाणे.</td></tr>
<tr><td>अभियोग पक्ष</td><td colspan="3">महाराष्ट्र शासन द्वारे: पोलीस स्टेशन अधिकारी, पोलीस स्टेशन शहापूर, ता. शहापूर, जि. ठाणे.</td></tr>
<tr><td>द्वारे प्रतिनिधित्व</td><td colspan="3">सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती. गायत्री मोरे, अभियोग पक्षाकरिता</td></tr>
<tr><td>आरोपी</td><td colspan="3">१. राम फुलचंद कनोजीया, वय २२ वर्षे,<br>रा. टिटवाळा, मांडा, ता. कल्याण, जि. ठाणे<br>२. शाम फुलचंद कनोजीया, वय २० वर्षे,<br>रा. टिटवाळा, मांडा, ता. कल्याण, जि. ठाणे<br>३. राम आश्रय यादव, वय २५ वर्षे,<br>रा. धम्मदिपनगर, गालेगाव, ता. कल्याण, जि. ठाणे.<br>४. विनय रामहंस सिंह, वय २२ वर्षे,<br>रा.– महात्मा फुले नगर, मोहने, ता. कल्याण, जि. ठाणे.</td></tr>
</table>

| | |
|---|---|
| **द्वारे प्रतिनिधित्व** | वकील श्री. एस. आर. महाजन आरोपींसाठी. |

## <u>भाग 'ब'</u>

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | :- | १७/०९/२००३ |
| प्रथम खबर अहवाल तारीख | :- | १७/०९/२००३ |
| आरोपपत्र दाखल तारीख | :- | १४/१०/२००३ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | :- | १८/०१/२००८ |
| पुरावे सुरू होण्याची तारीख | :- | २८/११/२०२५ |
| निकालाची राखीव तारीख | :- | -- |
| निकालाची तारीख | :- | १२/०५/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख | :- | -- |

## <u>आरोपीचा तपशील</u>

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याची तारीख | बेल वर सोडल्याची तारीख | दोषारोप | निर्दोष मुक्तता अथवा दोषी ठरविले | शिक्षा | कलम ४२८ सी.आर.पी.सी. नुसारचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **राम फुलचंद कनोजीया** | १७/०९/२००३ | २९/०९/२००३ | भा.दं.सं. कलम ३९४ सह ३४ अन्वये | निर्दोष मुक्तता | -- | -- |
| २ | **शाम फुलचंद कनोजीया** | १७/०९/२००३ | २३/०९/२००३ | | निर्दोष मुक्तता | -- | -- |
| ३ | **राम आश्रय यादव** | १७/०९/२००३ | २९/०९/२००३ | | निर्दोष मुक्तता | -- | -- |
| ४ | **विनय रामहंस सिंह** | १७/०९/२००३ | २४/०९/२००३ | | निर्दोष मुक्तता | -- | -- |

## भाग 'क'

## फिर्यादी / बचाव / न्यायालयाच्या साक्षीदारांची यादी

अ. अभियोग पक्ष :

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र. १ | अनिल हरिभाऊ भोसले | पंच |
| सा.क्र. २ | गोविंद मोतीराम नलावडे | पंच |

ब. बचावाचे साक्षीदार, जर असतील तर:

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| -- | -- | -- |

क. न्यायालयाचे साक्षीदार, जर असतील तर:

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| -- | -- | -- |

## फिर्यादी / बचाव / न्यायालयीन निशाणी क्रमांक

अ. अभियोग पक्ष :

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| -- | -- | -- |

ब. बचाव पक्ष :

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| -- | -- | -- |

क. न्यायालयाचे निशाणी :

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| -- | -- | -- |

ड. भौतिक वस्तू :

| अ.क्र. | भौतिक वस्तू क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**: न्यायनिर्णय :**

(दिनांक १२ मे, २०२६ रोजी घोषित.)

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत पुढीलप्रमाणे,**

दि. १७/०९/२००३ रोजी ०३.०० वा. सु डोहळा येथून फिर्यादी विजय कल्लुसिंग राजपुत उल्हासनगर येथे माल घेण्यास निघाले व मुंबई-आग्रा हायवे रोडवर जावून बसस्टॉप वरुन पडघा बाजुकडून आलेले एक रिक्षात बसून वाशिंद बाजुकडे जाण्यास निघाले. रिक्षात एक ड्रायव्हर व पाठीमागे तीन इसम २० ते २५ वयोगटातील मजबुत बाधा असलेले सावळे वर्णनाचे त्यातील एकाचे अंगात लाल शर्ट व दोघांचे अंगात सफेद शर्ट दाढी साधारण असलेले फिर्यादी रिक्षात पाठीमागे बसले होते. त्यांनी फिर्यादीला कुठे जायचे असे विचारले तेव्हा फिर्यादीने उल्हासनगर येथे माल घेण्यास जायचे असे सांगितले तेव्हा फिर्यादीची रिक्षा पाली फाटयाचे पुढे उतरणीवर गेली असता त्यातील लाल शर्ट घातलेले इसमाने फिर्यादीचे तोंड दाबून चाकुचा धाक दाखवून ''जो कुछ पैसा है ओ निकाल दे'' असा दम दिला व रिक्षा थांबवून इतर सफेद शर्ट घातलेले दोघांनी फिर्यादीला तोंडावर, पोटात ठोशाबुक्क्यांनी मारहाण करुन जबरीने फिर्यादीचे शर्टाचे खिशातील रु. १००, ५० व १० दाराच्या नोटा व मालाचे पिशवीत ठेवलेली चिल्लर अशी एकुण रोख रक्कम १४९० रु जबरीने काढून घेवून फिर्यादीला रोडचे बाजुस गवतात ढकलून पळून गेले. त्यावेळी फिर्यादी रोडवर येवून आरडाओरड करीत असताना वाशिंद पोलीस दुरक्षेत्राचे पोलीस पेट्रोलींग फिरत असल्याने त्यांनी फिर्यादीला पाहून फिर्यादीकडे विचारणा केली असता

फिर्यादीने त्यांना रिक्षातील वरील वर्णनाचे इसमांनी चाकुचा धाक दाखवून मारहान करुन रोख रक्कम घेवून शहापूर बाजुकडे पळून गेल्याचे तसेच रिक्षा सफेद हुडची असल्याचे माहिती कळविल्याने त्यावेळी पोलीसांनी मोटार सायकल वरुन आलेले गणपत हालके यांस थांबवून त्याचे गाडीवर फिर्यादीला बसवून शहापूर बाजुकडे रिक्षाचा पाठलाग करीत शोध घेत गेले असता शहापूर गावात संतोष हॉटेल समोर एक सफेद हुडची रिक्षा उभी असलेली दिसली. तसे तिचे ड्रायव्हरला पाहताच फिर्यादीने पोलीसांना हाच रिक्षा ड्रायव्हर असल्याचे कळविले. पोलीसांनी त्यास ताब्यात घेवून त्याचे सोबतचे तीन लोकांबाबत विचारता ते हॉटेलमध्ये गेल्याचे कळविले. त्यांनाही ताब्यात घेतले व पोलीसांनी त्यांची अंगझडती घेतली असता लाल रंगाचा शर्ट घातलेले इसमाचे खिशात एक चाकु मिळून आला तसेच फिर्यादीकडील रोख रक्कम नोटा सफेद शर्ट घातलेले साधारण दाढी वाढलेले इसमाचे खिशात शर्टाचे मिळून आले तसेच चिल्लर रिक्षाचे आतील डिक्कीत मिळून आली तसा पोलीसांनी पंचनामा करुन रोख रक्कम व आरोपीन यांना ताब्यात घेतले त्यावेळी आरोपी यांना पोलीसांनी त्याचे नाव, पते विचारले असता लालशर्ट घातलेला चाकु मिळून आलेले इसमाचे नाव राम आश्रय यादव तसेच रोख रक्कम मिळून आलेले इसमाचे नाव राम फुलचंद कनोजीया व त्याचा जोडीदार शाम फुलचंद कनोजीया तसेच रिक्षा चालक विजय रामहंस सिंह असे असल्याचे फिर्यादीला समजले. म्हणून फिर्यादीने शहापूर पोलीस स्टेशन येथे तक्रार नोंदविली.

२. अशा स्वरुपाच्या फिर्यादीवरुन पोलीस ठाणे अधिकारी, शहापूर यांनी भारतीय दंड संहिता १८६० च्या कलम ३९४ सह कलम ३४ नुसार गुन्हा केल्याच्या आरोपासाठी अपराध क्रमांक १७५/२००३ दाखल केला. पुढील तपास पोलीस हवालदार बी. के. कोळी यांनी केला.

त्यांनी घटनास्थळावर जावून दोन पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला. साक्षीदारांचे बयाण नोंदविले. जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त केले. तपासाअंती आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने प्रस्तूत दोषारोपपत्र सादर करण्यात आले.

३. आरोपींवर नि.क्र. २५ वर दोषारोप नोंदविला. सदर दोषारोपातील मजकुर आरोपीला त्याच्या बोलीभाषेत मराठीमध्ये वाचुन दाखविण्यात आला. आरोपीने सदर गुन्हा नि.क्र. २६ ते २९ वर नाकबुल असल्याचे सांगुन संपरीक्षेची मागणी केली. आरोपींविरुध्द गुन्हयात गोवणारा पुरावा नसल्याने त्यांचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ख) नुसार जबाब नोंदविण्यात आला नाही.

४. उपलब्ध अभिलेखावरील दस्त व दोन्ही पक्षांचा विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ आले आणि त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह मी पुढे दिले आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोगपक्षाने हे सिद्ध केले काय की, दि. १७/०९/२००३ रोजी १५.०० ते १६.३० वाजेच्या सुमारास पाली गावाचे हद्दीत ऑटोरिक्षातून जात असताना संगनमताने फिर्यादी विजय कल्लुसिंग रजपुत यांना चाकुचा धाक दाखवून त्यांच्या जवळील रु. १४९० ची रक्कम जबरदस्तीने लुबाडली आणि त्यावेळी तुम्ही आपखुशीने फिर्यादी यांना मारहाण करुन जखमी केले आणि त्याद्वारे तुम्ही **भारतीय दंड विधानाचे कलम ३९४ सह कलम ३४** अन्वये गुन्हा केला ? | ... नाही |
| २ | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे |

| | | |
|---|---|---|
| | | आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |

## –: कारणमिमांसा :–

५. अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी पंच सा.क्र ०१ अनिल हरिभाऊ भोसले, यांचा पुरावा नि.क्र. ३० वर व पंच सा.क्र. ०२ गोविंद मोतीराम नलावडे यांचा पुरावा नि.३२ वर नोंदविण्यात आला. सबब नि.क्र. १ वर आदेश पारीत करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

६. पंच सा.क्र. ०१ अनिल हरिभाऊ भोसले यांनी त्यांच्या सरतपासात असे सांगितले आहे की, पोलीसांनी त्याला पंचनाम्याकरिता कोठेही बोलाविले नाही. पोलीसांनी त्याच्या समक्ष कोणताही पंचनामा केला नाही. त्याला जप्ती पंचनामा दाखविण्यात आले. त्यावर त्याची सही आहे. त्यातील मजकुर त्याला माहित नाही. त्यास सही पुरता नि.क्र. ३१ देण्यात येत आहे. अभियोग पक्षाद्वारे सदर साक्षीदाराची उलटतपासणी घेण्यात आली. परंतु त्याने सरकारी वकीलांद्वारे विचारण्यात आलेल्या सर्व सूचक प्रश्नांना नकारार्थी उत्तरे दिली. अभियोगपक्षाच्या या महत्वाच्या साक्षीदाराने अभियोगपक्षास सहकार्य केले नाही.

७. पंच सा.क्र. ०२ गोविंद तुकाराम नलावडे यांनी त्यांच्या सरतपासात असे सांगितले आहे की, पोलीसांनी त्याला पंचनाम्याकरिता शहापूर पोलीस ठाण्यात बोलविले होते. पोलीसांनी त्याच्या समक्ष जप्ती व निवेदन पंचनामा तयार केला नाही. त्याला जप्ती व निवेदन पंचनामा दाखविण्यात आले. त्यावर त्याची सही आहे. त्यातील मजकुर त्याला माहित नाही. त्यास सही

पुरता नि.क्र. ३३ देण्यात येत आहे. तो आरोपींना ओळखत नाही. अभियोग पक्षाद्वारे सदर साक्षीदाराची उलटतपासणी घेण्यात आली. परंतु त्याने सरकारी वकीलांद्वारे विचारण्यात आलेल्या सर्व सूचक प्रश्नांना नकारार्थी उत्तरे दिली. अभियोगपक्षाच्या या महत्वाच्या साक्षीदाराने अभियोगपक्षास सहकार्य केले नाही.

८. सदर प्रकरणात खुद्द फिर्यादी साक्षीदार हा मिळून आलेला नाही. प्रकरण हे २२ वर्षापेक्षा अधिक जुने आहे. इतर साक्षीदारांना वारंवार समंस काढून देखील हजर झाले नाही. अभियोगपक्षाला वारंवार संधी देवून सुद्धा ते फिर्यादी व इतर साक्षीदारांना न्यायालयात साक्षेसाठी हजर ठेवू शकले नाही. अभिलेखावर आरोपीविरुध्द कोणताही पुरावा न आल्यामुळे दि. १७/०९/२००३ रोजी १५.०० ते १६.३० वाजेच्या सुमारास पाली गावाचे हद्दीत ऑटोरिक्षातून जात असताना, ता. शहापूर, जि. ठाणे येथे फिर्यादी विजय कल्लुसिंग रजपुत यांना चाकुचा धाक दाखवून त्यांच्या जवळील रु. १४९० ची रक्कम जबरदस्तीने लुबाडली आणि त्यावेळी तुम्ही आपखुशीने फिर्यादी यांना मारहाण करुन जखमी केले, या बाबी पुराव्यानिशी सिध्द होत नाही. जरी आरोपी क्र. १ ते ४ फरार असले तरीही फौ.प्रं.सं. १९७३ च्या कलम ३५३(६) नुसार त्यांच्याविरुद्ध त्यांच्या दोषमुक्ततेचा निर्णय देता येवू शकतो. आरोपींविरुद्ध कोणताही गुन्हा सिद्ध झालेला नाही. सबब आरोपी हा निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतो. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मुददा क्र. २ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. आरोपी क्र. १ **राम फुलचंद कनोजीया** आरोपी क्र. २ **शाम फुलचंद कनोजीया** आरोपी क्र. ३ **राम आश्रय यादव** व आरोपी क्र. ४ **विनय रामहंस सिंह** यांना फौजदारी प्रक्रिया

संहिता कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड संहिता कलम ३९४ सह कलम ३४ च्या आरोपातुन निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. सदरील गुन्ह्यामध्ये जप्त केलेली प्लॅस्टीकची पिशवी ज्यामध्ये रु. ५, २, १ व ५० पैसे दराची नाणी व एक रिक्षा तसेच कडे व रु. १०० दराच्या ५ नोटा, रु. ५० दराच्या ४ नोटा व रु. १० दराच्या १७ नोटा अपिल कालावधीनंतर मुळ मालकास परत करण्यात यावी व एक चाकू अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावा.

४. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ)च्या तरतुदीच्या पुर्ततेसाठी आरोपींनी प्रत्येकी रु.१५,०००/- वैयक्तीक जातमुचलका व तेवढयाच रक्कमेचा जामिन मुचलका दयावा.

न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.

**Sd/-**

**(कु. एस. एस. कुळकर्णी)**
**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,**
**शहापूर, जि. ठाणे.**

**स्थळ – शहापूर.**
**दि. १२/०५/२०२६**